अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

# लौकिक जीवनात नैतिक शिक्षण मोलाचे

प्रत्येकाची अशी इच्छा असते की आपले कुटुंब, आपला समाज, आपले राष्ट्र सुस्थितीत असावे. परंतु सुस्थितीसाठी ज्या किमान आवश्यक गोष्टी लागतात त्यादेखील प्रत्येकालाच खात्रीने मिळतीलच हे सांगता येत नाही. सुस्थिती मग ती कुटुंबाची असो, समाजाची असो किंवा देशाची असो. यासाठी ज्या मुख्य गोष्टीची गरज असते ती म्हणजे प्रत्येकामध्ये सुविचार आणि सुसंस्कार असला पाहिजे. या दोन्ही गोष्टी मिळण्याचे किंवा मिळवण्याचे माध्यम शिक्षण आणि प्रसारमाध्यम! शिक्षण याचा अर्थ केवळ शाळा, कॉलेज नव्हे, शिक्षणाची खरी सुरुवात घरातून होते. शिक्षणही दोन प्रकारचे असते. एक नैतिक आणि दुसरे लौकिक! नैतिक शिक्षण जे पिढ्यान्‌पिढ्यांपासून चालत येते आणि पुढे चालू ठेवावे लागते. ज्यांचा परंपरा संस्कृतीशी फार जवळचा संबंध असतो. काळ कितीही बदलला तरी या नैतिक शिक्षणाची चौकट कायम असते. कारण ते एकूणच जीवनमूल्यांशी संबंधित असते. नोकरी, पैसा उत्पन्नापेक्षा मनाची प्रसन्नता आणि शरीराची संपन्नता या बाबी या नैतिक शिक्षणाची उदात्तता अधोरेखीत करतात. नैतिक शिक्षणात उक्ती आणि कृती एकत्रितपणे व्यक्त होतात. ज्यावेळी तसे होत नाही तेव्हा ते आपोआप अनैतिक ठरते. एकूण जीवन व्यवहाराचे जे किमान आधार आहेत ते सांगण्याचा, मनावर बिंबवण्याचा प्रयत्न नैतिक शिक्षणातून होतो. काळाच्या प्रभावात ते नाहीसे होऊ नये अशी दक्षता, काळजी घेतली जाते. म्हणून त्याचा संबंध प्राचीन काळीच धर्माशी जोडला गेला. किंबहुना असे नैतिक शिक्षण म्हणजे एक धर्म असेही सांगण्याचा प्रयत्न झाला. तो मोठ्याप्रमाणावर यशस्वी ठरला. लौकिक शिक्षण काळाबरोबर बदलते. म्हणूनच कदाचित त्याचा आणि नैतिकतेचा फार घनिष्ट संबंध राहू शकत नाही. यासाठीच व्यक्ती कुटुंब, समाजाच्या सुस्थितीचा विचार करताना जे दीर्घकाळ टिकेल हे पाहाणेदेखील महत्त्वाचे ठरते. आजही कितीही शिकलेली मोठी व्यक्ती असली तरी तो कोणत्या गावचा आहे. त्याच्या घरा–दाराचा तपास केला जातो. आई–वडील, आजी–आजोबा, मामा यांची माहिती घेण्याचा प्रयत्न होतो. ओळख–पाळख काढून कुठे काही धागा–दोरा लागतो का असा त्यामागचा उद्देश असतो. कारण त्या लौकिक शिक्षणाबरोबर नैतिक शिक्षणाचीही माहिती घेतली जाते. बऱ्याच वेळा लौकिक शिक्षण आणि नैतिक शिक्षणाचीही माहिती घेतली जाते. बऱ्याच वेळा लौकिक शिक्षणापेक्षाही या नैतिक शिक्षणाची जास्त खात्री वाटते. विश्वास वाटत असतो. यासारख्या गोष्टीतूनही लौकिक शिक्षण आणि नैतिक शिक्षणातला फरक लक्षात येऊ शकतो. आजच्या बदलत्या काळात तर लौकिक शिक्षणाबरोबर नैतिक शिक्षणाची सर्वाधिक आवश्यकता वाटू लागली आहे.

### जीवनाचे रहाटगाडगे

आज समाजात शिक्षणाची लोकप्रियता वाढते आहे. चांगले जीवन जागण्यासाठी शालेय, महाविद्यालयीन शिक्षण घेतलेच पाहिजे अशी समजूत दिवसेंदिवस पक्की होत आहे. सुखाची साधने जीवनात प्राप्त करायची असतील तर इंजिनीअर, डॉक्टरसारख्या नोकऱ्या–व्यवसाय करता आले पाहिजेत. मोठ्या पगाराची नोकरी ही आजच्या काळाची गरज झाली आहे. आपले घर, कुटुंब, परिवाराची आर्थिक परिस्थिती चांगली असावी असे प्रत्येकाला वाटते. त्यात अनेकजण यशस्वीही होतात. परंतु हा सगळा खटाटोप म्हणजे लौकिक शिक्षणातून लौकिक यशासाठी चाललेला असतो. हे लौकिक यश जरी मिळाले तरी ते दीर्घकाळ टिकवायचे असेल तर त्यासाठी नैतिक शिक्षण अनिवार्यच ठरते. या नैतिक शिक्षणात एकूण जीवनमूल्यांचा विचार महत्त्वाचा ठरतो. संस्कार आणि जे सत्य असेल, त्याचा पाठपुरावा करण्याची तळमळ अभिप्रेत असते. केवळ शिक्षण मिळाले, त्यासाठी पैसा खर्च केला, कष्ट घेतले, आता चांगला पगार किंवा मोबदला मिळाला म्हणजे सगळे संपले, असे होत नाही. लौकिक शिक्षणातून मिळालेला हा वसा चांगुलपणाच्या, प्रामाणिकतेच्या जोरावर टिकवून ठेवणे म्हणजे नैतिक शिक्षणाचा योग्य उपयोग झाला असा अर्थ होत नाही. ही गोष्ट इतक्या सहजपणे कोणाच्या लक्षात येत नाही. जीवनाचे रहाटगाडगे एका ठरावीक लयीत फिरत राहते. परंतु ज्या कारणांमुळे ही लय टिकावी असे वाटते ते त्या रहाटाचे दोन खांबही तितकेच मजबूत असावे लागतात. लौकिक आणि नैतिक शिक्षण हे ते दोन खांब आहेत. ते जेवढे भक्कम तेवढे जीवनाचे रहाटगाडगे दीर्घकाळ व्यवस्थितपणे सुरू राहू शकते. अनेकवेळा, अनेक गोष्टी कालाय तस्मै नमः असे म्हणून जेव्हा आपण सोडून देतो किंवा त्याकडे दुर्लक्ष करतो तेव्हा नैतिकता दुबळी पडलेल्या नैतिकतेसाठी घेतलेल्या शिक्षणाचा तो पराभव असतो आणि लौकिक शिक्षणाचा तो विजय ठरतो. परंतु काळाला अशाप्रकारे काही गोष्टी, सवयी अर्पण करीत जेव्हा आपण तडजोड करू लागतो तेव्हा पुढच्या पिढीचे भवितव्य अंधकारमय करीत जाण्यासारखे ते म्हणता येईल. यापेक्षा नैतिकतेच्या बळावर असे काही चमत्कार करता येतात की ज्यातून भविष्यकाळ आपल्याला म्हणजेच समाजाला नमस्कार करील अशी स्थिती आपण निर्माण करू शकतो. मात्र त्यासाठी नैतिक बळ प्रचंड असावे लागते. आज आपण ज्याला एक सुधारणावादी किंवा पुढारलेले विकसित जग म्हणतो, त्यातसुद्धा प्रगती आणि उन्नती याची सरमिसळ केली जाते. लौकिक शिक्षणातून जे काही प्राप्त होते किंवा मिळवले जाते त्याला प्रगती म्हणता येईल आणि नैतिक शिक्षणातून जे काही उभे राहते त्याला उन्नती म्हणता येईल. नैतिक शिक्षण, पैसा, प्रतिष्ठा याची हमी देता येत नाही. परंतु आत्मीक समाधानाला केव्हा खात्री असते. परंतु त्यातून सुख समाधानाची कमी ठेवत नाही. लौकिक शिक्षणात पैसा, प्रतिष्ठा मिळविण्याची खात्री लागेल हे कधीही सांगता येत नाही. म्हणूनच आजच्या सगळ्या बदलत्या जीवनशैलीचा आणि जीवनमानाचा विचार केला तर वेगाच्या आकर्षणापोटी आवेगाचाच विचार होत राहिला तर त्यात व्यक्ती, कुटुंब किंवा समाज यापैकी कोणाचेही हित साधले जाणार नाही. लौकिक शिक्षण आणि जीवन याचा मेळ घालताना नैतिक शिक्षणाचा केंद्रबिंदू अनिवार्यच ठरतो.